**सन २०२५-२०२६ च्या पुरक निवडसूचीमध्ये नायब तहसिलदार संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांना तहसिलदार संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन आदेश क्र.पदोन्नती-२०२५/प्र.क्र. २२१(भाग-१)/आस्था-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २० ऑगस्ट, २०२६

संदर्भ:- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्या-१२, दि. ०१.०८.२०१९
२) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. सेवाज्ये-२०२२/प्र.क्र.१२७/ई-९, दि.१७.०८.२०२२.
३) मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.ईएलआर-२०२६/ प्र.क्र.७०/२६/३३, दि.१४.०५.२०२६, दि.१५.०५.२०२६ व दि.१७.०६.२०२६

**शासन आदेश** :-

सन २०२५-२६ या निवडसूची वर्षात तहसिलदार संवर्गातील संभाव्य रिक्त पदे नायब तहसिलदार या निम्न संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांना सन २०२५-२६ च्या पूरक निवडसूचीमध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनंतर खालील नमुद नायब तहसिलदार (गट-ब) (राजपत्रित) {वेतनश्रेणी एस-१४ (रू.३८६००-१२२८००)}संवर्गातील पात्र अधिकाऱ्यांना तहसिलदार (गट-अ) (राजपत्रित) {वेतनश्रेणी एस-१९ (रू. ५५१००-१७५१००)} संवर्गात सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्यांचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | ६००१ | श्रीमती एस.एम पुल्लरवार (आडेपवार) | वि.मा.प्र. |
| २. | ६४२३ | श्री. किशोर रोहिदास सानप | इ.मा.व. |
| ३. | ६४२४ | श्री. अभिजित वांढेकर | इ.मा.व. |
| ४. | ६४२५ | श्री.यशवंत बाळासाहेब पवार | इ.मा.व. |
| ५. | ६४२७ | श्री. भारती अमित रमेश | भ.ज.ब. |
| ६. | ६४२८ | श्री. रविंद्र शिवाजी मोरे | अ.जा. |
| ७. | ६४२९ | श्री. गौरीशंकर चव्हाण | वि.जा.अ. |

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्यांचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| ८. | ६४३० | श्री रामदास बाबुराव बिजे | भ.ज.ब |
| ९. | ६४३१ | श्री.रविराज अरूण जाधव | वि.जा.अ. |
| १०. | ६४३२ | श्रीमती योगिता ढोले | भ.ज.ड. |
| ११. | ६४३३ | श्रीमती चैताली दराडे | भ.ज.ड. |
| १२. | ६४३४ | श्री.एस.एस.व्हटटे | वि.मा.प्र. |
| १३. | ६४३५ | श्री.देशटवाड काशीनाथ | अ.ज. |
| १४. | ६४३६ | श्रीम. कविता देशमुख | इ.मा.व. |
| १५. | ६४३७ | श्रीमती. आर.आर. बेहरे | इ.मा.व. |
| १६. | ६४३८ | श्रीमती हंकारे सुजाता | अ.जा. |
| १७. | ६४३९ | श्रीमती मनिषा माने | इ.मा.व. |
| १८. | ६४४० | श्रीमती सुप्रिया श्रीमंत वक्ते | अ.जा. |
| १९. | ६४४१ | श्री.एस.आर.आहेर | इ.मा.व. |
| २०. | ६४४२ | श्री.गणेश देवराम सुपे | अ.ज. |
| २१. | ६४४३ | श्रीमती डॉ. मीनाक्षी गोसावी | भ.ज.ब. |
| २२. | ६४४४ | श्री. हेमंत दयाराम तायडे | अ.जा. |
| २३. | ६४६१ | श्री. यु.डी. तुंडलवार | खुला |
| २४. | ६४८० | श्री सुनिल देशमुख | खुला |
| २५. | ६४८२ | श्री व्ही आर हरणे | इ.मा.व. |

उक्त पदोन्नत अधिकाऱ्यांचे पदस्थापनेबाबतचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

२. **उक्त नमूद नायब तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून तहसिलदार पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे:-**

१) मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि. २५/५/२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत सा.प्र.वि. (१६-ब) कार्यासनाच्या दि.०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचना तसेच दि.०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर सहमती देण्यात येत आहे.

२) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा / सेवाज्येष्ठतेबाबतचा कोणताही हक्क मिळणार नाही.

३) तहसिलदार पदावरील तदर्थ पदोन्नती ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४) महसूल व वन विभाग शासन परिपत्रक दि.१७.०८.२०२२ अन्वये नायब तहसिलदार संवर्गाची दि.०१.०१.२०१५ ची राज्यस्तरीय एकत्रित अंतिम ज्येष्ठतासूची सदर पदोन्नतीसाठी विचारात घेण्यात आली आहे. त्यामुळे सदर पदोन्नत्या या नायब तहसिलदार संवर्गातील नियमितीकरणामुळे, अंतिम ज्येष्ठतासूचीत होणाऱ्या बदलाच्या अधीन असतील.

५) पदोन्नत होणाऱ्या अधिकाऱ्यांविरूध्द विभागीय चौकशी / न्यायालयीन प्रकरण अथवा प्रशासकीय कारणास्तव त्यांना पदोन्नतीच्या पदावर कार्यरत ठेवणे उचित होणार नाही, अशी बाब उद्भवल्यास / निदर्शनास आल्यास संबंधित अधिकाऱ्यास पदावनत करण्याच्या अधीन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

६) पदोन्नतीच्या अनुषंगाने काही प्रशासकीय कारणास्तव अनावधानाने वरीष्ठ अधिकारी पदोन्नतीपासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आल्यास / न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास व तहसिलदार संवर्गातील पदोन्नती कोटयात रिक्त पद उपलब्ध नसल्यास कनिष्ठतम अधिकाऱ्याला पदावनत करण्याच्या अधीन राहून सदर पदोन्नती राहील.

७) संबंधित अधिका-यांनी पदोन्नती नाकारल्यास शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/ कार्यासन-१२ दि. १२.०९.२०१६ मधील नमूद तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

८) सदर पदोन्नती ही नायब तहसिलदार संवर्गाच्या अंतिम ज्येष्ठतासूचीच्या अनुषंगाने / तहसिलदार पदावरील पदोन्नतीच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय / मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही न्यायालयीन प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून असेल.

९) सदर पदोन्नती दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट-अ व गट-ब मधील पदांवर पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.२२.०७.२०२१ रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०५.०७.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील व दि.२३.०७.२०२१ रोजीच्या शासन पत्रान्वये दिलेल्या सुचनांच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१०) सदर पदोन्नतीचे आदेश प्राप्त झाल्यापासून संबंधित अधिकाऱ्यांना शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येऊ नये.

११) नायब तहसिलदार संवर्गातून तहसिलदार या संवर्गात पदोन्नत झालेल्या उपरोक्त अधिकाऱ्यांनी पदस्थापनेच्या पदावर रुजू होऊन कार्यभार स्वीकारल्यानंतरच तहसिलदार एस-१९-(रू. ५५१००-१७५१००) या संवर्गाच्या वेतनाचे लाभ अनुज्ञेय राहतील.

१२) उपरोक्त पदोन्नत अधिकाऱ्यांविरुध्द भविष्यात कोणत्याही प्रकारचा फौजदारी अथवा इतर गुन्हा दाखल झाल्यास त्याबाबतचा सविस्तर अहवाल संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत तात्काळ शासनास सादर करण्यात यावा. तसेच, संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द क्षेत्रिय स्तरावर कोणतीही विभागीय चौकशी सुरु असल्यास अथवा सुरु झाल्यास तात्काळ शासनास अवगत करण्यात यावे.

३. सदरचे आदेश हे सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०८२०१८४०१३१८४८ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.08.20 19:01:01 +05'30'

**(महेश वरूडकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

सर्व विभागीय आयुक्त.

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास/गृहनिर्माण) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क/क्रीडा व युवक कल्याण/ अल्पसंख्याक विकास आणि औकाफ) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६. अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य
७. संबंधित जिल्हाधिकारी.
८. प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
९. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
१०.संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
११.संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
१२.अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
१३.संबंधित तहसिलदार (संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत).
१४.उप सचिव (आस्था-३) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
१५.सह सचिव (कार्यासन-१२/सेवा-२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
१६.अवर सचिव (आस्था-४) / कक्ष अधिकारी (आस्था-४अ) / कक्ष अधिकारी (आस्था-९)
१७.निवड नस्ती (कार्यासन आस्था-३), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.